वाचले:- १) महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृती वेतन ) नियम-१९८२ मधील नियम १०(१)
२) मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय नेहरुनगर यांचे दि.२८/०१/२०१६ रोजीचे पत्र
३) मा.आयुक्त यांचेकडील अधिकार प्रदान आदेश क्र.प्रशा/२/कावि/४४७/१५, दि.२०/१०/२०१५
४) मा.लेखाधिकारी यांचे कडील दि.२९/१२/२०१५ चे घरबांधणी अग्रीम नादेय प्रमाण पत्र.
५) मा.शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग ,यांचेकडील दि.१८ ०२/२०१६ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र. माध्य/शि/१/कावि/२५४/१६
दि. १८ /२/२०१६

विषय – <u>नियत वयोमानानूसार सेवानिवृतीबाबत.</u>
**श्रीम.शेटे हेमलता शशिकांत, सहा.शिक्षिका**
**(संगणक क्रं.५७७९)**

**आदेश,**

**श्रीम.शेटे हेमलता शशिकांत, सहा.शिक्षिका** हया पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सहा.शिक्षका या पदावर माध्यमिक शिक्षण विभागात दि.१३/०१/१९८६ रोजी रूजू झालेले आहेत. **श्रीम.शेटे हेमलता शशिकांत, सहा.शिक्षिका,** यांची जन्मदिनांक १४/०३/१९५८ अशी असून त्यांच्या वयास दिनांक ३१/०३/२०१६ रोजी ५८ वर्षे पूर्ण होत असल्याने श्रीम.शेटे **हेमलता शशिकांत, सहा.शिक्षिका,** यांना ३१/०३/२०१६ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानूसार सेवानिवृत करणे आवश्यक आहे.

शासकीय कर्मचारी तो ज्या महिन्यात ५८ वर्ष वयाचा होईल,त्या महिन्याच्या अखेरच्या दिवशी मध्यान्होत्तर सेवानिवृत होईल,तसेच ज्या शासकीय कर्मचा-याची जन्मतारीख ०१ असेल तो कर्मचारी यथास्थिती ५८ वर्ष वयाचा होताच मागील महिन्याच्या शेवटच्या दिवशी मध्यान्होत्तर सेवानिवृत होईल,अशी महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृती वेतन ) नियम-१९८२ मधील नियम १०(१) मध्ये तरतूद आहे.या तरतूदीप्रमाणे **श्रीम.शेटे हेमलता शशिकांत,** सहा.शिक्षिका हया दिनांक ३१/०३/२०१६ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार मध्यान्होत्तर सेवानिवृत होतील.

**श्रीम.शेटे हेमलता शशिकांत,** सहा.शिक्षिका, यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नसून त्यांचेकडून महानगरपालिकेस घरबांधणी कर्ज रक्कम येणे बाकी नसले बाबत वाचले क्र. ४ अन्वये म. लेखाधिकारी यांनी नाहरकत प्रमाणपत्र दिले आहे. तसेच वाहन कर्ज,संगणक कर्ज,घर दूरूस्ती कर्ज,वैद्यकीय अग्रीम तसेच माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित यांचेकडील कर्ज येणे बाकी नाही व इतर कोणत्याही प्रकारचे येणे बाकी नसलेबाबतचे दाखले त्यांनी सादर केले आहेत.तसेच **श्रीम.शेटे** हेमलता शशिकांत,

सहा.शिक्षिका यांना सेवासातत्य देण्यात आलेले नाही. **श्रीम.शेटे हेमलता शशिकांत,** सहा.शिक्षिका यांचे सेवानिवृतीबाबत मुख्याध्यापकांनी शिफारस केली आहे.

सबब.मी शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११ ०१८.उपरोक्त संदर्भ क्र. ३ अन्वये विभाग प्रमुख म्हणुन मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृती वेतन ) नियम-१९८२ मधील तरतूद या आदेशान्वये **श्रीम.शेटे हेमलता शशिकांत, सहा.शिक्षिका**, यांना दिनांक ३१/०३/२०१६ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तुत आदेशाची सविस्तर नोंद **श्रीम.शेटे हेमलता शशिकांत, सहा.शिक्षिका,** यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

17/2/16

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

**प्रती,**

**श्रीम.शेटे हेमलता शशिकांत, सहा.शिक्षिका**
माध्यमिक विद्यालय नेहरुनगर

प्रतः- १) लेखा शाखा
२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष, ( प्रशासन ) सेवाजेष्ठता कक्ष,मागासवर्गीय कक्ष,कामगार कल्याण विभाग
३) माध्यमिक विभाग टेबल क्रं. २ व ४
४) माध्यमिक विद्यालय नेहरुनगर
२/- पुढील कार्यवाहीसाठी

Scanned with CamScanner